18 AUG 2026

सकाळ

# कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांना 'लोकशिक्षक' पुरस्कार

## डॉ. जत्राटकर, संजय थोरात यांचाही सन्मान

कोल्हापूर, ता. १७ : पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांना जाहीर झाला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती व संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी आज ही घोषणा केली.

ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवारी (ता. २१) सकाळी अकरा वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील ज्येष्ठ



डॉ. कामत



डॉ. जत्राटकर

समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना याच समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ हे पुरस्कार देण्यात येतात.



डॉ. थोरात

1 8 AUG 2026
तरूण भारत

# लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव कुलगुरू डॉ. कामत यांना जाहीर

त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार यावर्षी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जाहीर झाला आहे. तसेच लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कारासाठी निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ईश्वरपूर येथील डॉ. संजय थोरात यांची निवड केल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती, संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी सोमवारी दिली.



कुलगुरू कामत



डॉ. जत्राटकर



संजय थोरात

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते शुक्रवारी, २१ रोजी सकाळी ११ वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार डॉ. एन. डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांना प्रदान करण्यात येणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

18 AUG 2026
पुण्यनगरी

# लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार डॉ. कामत यांना जाहीर



**कोल्हापूर** : पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने 'लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती, संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी ही घोषणा केली. हा पुरस्कार प्रदान सोहळा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते शुक्रवार, दि. २१ रोजी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे. याशिवाय प्रतिष्ठानच्या वतीने लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना देण्यात येणार आहे. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ हे पुरस्कार देण्यात येतात.

1 8 AUG 2026

जनप्रवास

# कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार जाहीर

- **कोल्हापुरात २१ ऑगस्टला प्रदान समारंभ**

**जनप्रवास : कोल्हापूर**

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती व संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी ही घोषणा केली.



ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवारी (ता. २१) सकाळी ११ वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे.

प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर, ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना याच समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.

पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ सदर पुरस्कार देण्यात येतात. या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. साहित्य परिषदेचे पुरुषोत्तम सदाफुले, आनंदा कांबळे, विजय कांबळे, रविंद्र भारती, निमिषा भारती, शार्दुल भारती आदी या कार्यक्रमाचे संयोजन करीत आहेत.

1 8 AUG 2026

लोकमत



# विद्यापीठात ध्वजारोहण; तिरंगा रॅली

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात शनिवारी स्वातंत्र्यदिनानिमित्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. यानंतर कुलगुरू डॉ. कामत यांनी प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. या निमित्ताने काढलेल्या तिरंगा रॅलीला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रचंड उत्साही प्रतिसाद लाभला.

1 8 AUG 2026

सकाळ

# विद्यापीठात ऑनलाइन पेमेंट प्रणालीचे उद्‌घाटन


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात एसबीआय ई-पे – एफएएस एकात्मिक व्हाउचर पेमेंट प्रणालीचे आज कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. स्टेट बँक ऑफ इंडिया आणि कॉम्पसर्व्ह कन्सल्टंट्स यांच्या सहकार्याने ही ऑनलाइन पेमेंट प्रणाली विकसित केली आहे. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी स्वागत केले. लेखा परीक्षक दुर्गाली गायकवाड आणि अंतर्गत हिशेब तपासनीस अजित चौगुले यांनी ई-पे प्रणालीचे सादरीकरण केले. स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक निशांतकुमार जयस्वाल, मुख्य व्यवस्थापक संदीप कुमार, पंकज पाटील, व्यवस्थापक ओवी सहस्त्रबुद्धे, उपव्यवस्थापक संदीप बुचडे, विनय गुप्ते, शशिकांत खोत उपस्थित होते.

18 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषा प्रौद्योगिकी'पुस्तकाचे विद्यापीठात प्रकाशन




कोल्हापूर/प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातील अभ्यागत प्राध्यापक डॉ. अक्षय भोसले लिखित 'भाषा प्रौद्योगिकी' या पुस्तकाचे प्रकाशन अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. मारुफ मुजावर यांच्या हस्ते काल झाले.

यावेळी प्रमुख अतिथी प्रा. मुजावर यांनी भाषा आणि तंत्रज्ञान यांच्यातील वाढते संबंध, आधुनिक काळातील भाषा प्रौद्योगिकीचे महत्त्व तसेच हिंदी भाषेच्या संदर्भातील नव्या संधींवर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. करेकट्टी यांनी पुस्तकाविषयी कौतुकोद्गार काढले. त्या म्हणाल्या, या पुस्तकात भाषा, संगणक, अभिकलनात्मक भाषाविज्ञान, प्राकृतिक भाषा संसाधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीनी अनुवाद तसेच भाषा प्रौद्योगिकीच्या विविध अनुप्रयोगांचा समावेश आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात हिंदी भाषेच्या अभ्यासाला नवी दिशा देणारा हा ग्रंथ विद्यार्थ्यांसह संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल.

डॉ. गीता दोडमणी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी परिचय करून दिला. लेखक डॉ. अक्षय भोसले यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. डॉ. सुवर्णा गावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले. यावेळी हिंदी अधिविभागातील शिक्षक, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

18 AUG 2026 क्रांतिसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ पत्रकारिता विभागासमोर वृक्षारोपण



कोल्हापूर(प्रतिनिधी):- क्रांतीदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागासमोर मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी फळझाडे तसेच फुलझाडांची लागवड करण्यात आली. पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, सायबरचे निवृत्त सहयोगी प्रा. डॉ. राजेंद्र पारिजात, डॉ. शिवाजी जाधव, शैलेश कोरे, यश हेगडे-पाटील यांच्यासह विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
18 AUG 2026 सिंधुदुर्ग समाचार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारचे शोषणमुक्त समाजाचे स्वप्न 'जेन-झी'ने साकारावे : डॉ. भारत पाटणकर

कोल्हापूर/प्रतिनिधी :

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या दृष्टिकोनातून प्रतिसरकार हे केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचे आंदोलन नव्हते, तर स्त्रीमुक्ती, जातिव्यवस्थेविरोध, जमीनदारशाहीचा अंत आणि सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त समाजनिर्मितीचे सुंदर स्वप्न होते. हे स्वप्न अद्याप पूर्ण झालेले नाही; ते साकार करण्याची जबाबदारी आता 'जेन-झी'ने स्वीकारावी, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे श्रीमती कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रतिसरकारची चळवळः रणरागिणी रणि टाकल्या' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात बीजभाषक म्हणून डॉ. पाटणकर आज बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते, तर, आमदार अरूण लाड, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. पाटणकर म्हणाले, प्रतिसरकारची संकल्पना केवळ इंग्रजांना हाकलून देण्यापुरती मर्यादित नव्हती. ब्रिटिशांच्या सत्ताकाळातच स्वातंत्र्यानंतरचा समाज उभा करण्याचा प्रयत्न त्यातून झाला. जनतेने ठरविलेलेच त्या भागात चालावे, या भूमिकेतून समांतर सत्तेची निर्मिती करण्यात आली. स्त्रियांच्या मुक्तीचा कार्यक्रम, जमीनदारांच्या दडपशाहीविरोधातील संघर्ष आणि पिढ्यान्‌पिढ्या कसणाऱ्या कुळांना जमिनीचा हक्क मिळावा, यांसाठी प्रतिसरकारने भूमिका घेतली. न्यायदान मंडळे, सेवा दल, ग्रामस्वच्छता, वाचनालये, सहभोजन, 'एक गाव एक पाणवठा' यांसारख्या उपक्रमांतून सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी करण्यात आली. जातीय विषमता, अस्पृश्यता, सावकारशाही आणि स्त्रियांवरील अन्यायाविरोधात प्रतिसरकारने संघर्ष केला. हा लढा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नव्हता, तर शोषित समाजाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी होता, असे डॉ. पाटणकर यांनी स्पष्ट केले.

प्रतिसरकारमध्ये शेतकरी, बलुतेदार आणि विविध शोषित घटकांतील तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्या त्यागातून निर्माण झालेले स्वातंत्र्य केवळ सत्तांतरापुरते मर्यादित न राहता सामाजिक आणि आर्थिक समतेत रूपांतरित व्हावे, ही त्यामागची भूमिका होती. मात्र सर्व प्रकारच्या शोषणाचा अंत करण्याचे प्रतिसरकारचे स्वप्न अद्याप साकार झालेले नाही. त्यामुळे बदलत्या काळात त्या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी आजच्या युवा पिढीने पुढाकार घेण्याची आवश्यकता डॉ. पाटणकर यांनी व्यक्त केली.




**'आदर्श ग्रामस्वराज्य निर्मितीची चळवळ'**

कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, प्रतिसरकार चळवळ ही केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धची लढाई नव्हती, तर आदर्श ग्रामस्वराज्याची निर्मिती करणारी आणि समाजातील विषमतेवर घाव घालणारी अभिनव चळवळ होती. सातारा-सांगली परिसरात जनमत संघटित करून अन्याय-अत्याचाराविरोधात लढताना प्रतिसरकारने न्यायदान समित्यांच्या माध्यमातून ग्रामराज्याचा प्रयोग केला; गरीब व नाडलेल्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासोबतच दारूबंदी, जुगारबंदी, हुंडाबंदी, गांधी पद्धतीने विवाह आणि अस्पृश्यता निवारण यांसारखे विधायक उपक्रम राबवून सामाजिक स्वराज्याची पायाभरणी केली. या चळवळीच्या इतिहासात पुरुष क्रांतिकारकांच्या योगदानाची नोंद झाली असली, तरी भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय देणे, संदेश पोहोचविणे, शस्त्रे लपविणे आणि प्रसंगी स्वतः शस्त्र हाती घेणाऱ्या लीलाताई पाटील, इंदुताई पाटणकर, राजमती पाटील यांच्यासह असंख्य रणरागिणींच्या योगदानाला अपेक्षित न्याय मिळालेला नाही. त्यामुळे विस्मृतीत गेलेल्या या स्त्रीशक्तीचा इतिहास संशोधनातून पुढे आणणे आणि तो नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हे आपले कर्तव्य आहे. प्रतिसरकार चळवळ आणि तिच्यातील स्त्रीशक्तीचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करण्याचाही विचार करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**'आपल्याच सरकारने बापूंना का पकडले?'**

यावेळी आमदार अरूण लाड यांनी जी.डी. बापू लाड यांचे प्रतिसरकारमधील कार्य आणि अन्य आठवणींना उजाळा दिला. अत्यंत प्रसिद्धीपराङ्मुख राहून स्वातंत्र्योत्तर कालखंडातही स्वातंत्र्याचे खरे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, नागरिकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी बापू अखेरपर्यंत संघर्षशील राहिले. विधिमंडळ सदस्य म्हणून मिळणारे निवृत्तीवेतन स्वतःसाठी अगर कुटुंबासाठी न वापरता ती संपूर्ण रक्कम समाजकार्यासाठीच वापरणारे बापू हे अत्यंत प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. ब्रिटीश सरकारला सळो की पळो करून सोडणाऱ्या जी.डी. बापूंना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्याच सरकारने का पकडले आणि तुरुंगात का टाकले, यावरही संशोधकांनी प्रकाश टाकायला हवा, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. दशरथ पारेकर, डॉ. कपिल राजहंस, वसंतराव मुळीक, डॉ. दीपा श्रावस्ती यांच्यासह संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रतिसरकारमधील कर्तृत्ववान स्त्रियांचा गौरव**

चर्चासत्रात दिवसभरात प्रतिसरकार चळवळीतील कर्तृत्ववान स्त्रियांच्या सहभागाविषयी विविध सत्रांमध्ये संशोधनपूर्ण चर्चा झाली. स्त्रियांच्या योगदानाचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख उपस्थित संशोधक व मान्यवरांनी केला. यामध्ये डॉ. पद्मजा पाटील, डॉ. कल्पना गुरव, प्रसाद कुलकर्णी, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. प्रकाश कुंभार, दमयंती पाटील, डॉ. दशरथ पारेकर, संपत मोरे, डॉ. दिनकर पाटील, विष्णू पावले, डॉ. अवनीश पाटील यांनी सहभाग घेतला. डॉ. भारती पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप झाला.

1 8 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

Estd. 1962
NAAC 'A++' Grade
With CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## DEPARTMENT OF SPORTS & PHYSICAL EDUCATION



**Admission Open for B.A.(Sports) Part I 2026-27**

**Join us - Let us help turn your dreams into reality**





Eligibility : Candidates must have passed 10+2 (HSC) in any stream (Arts, Commerce or Science) or Diploma Engineering (10+3) from any recognized Board

**Career opportunity**

- Sports Coach
- Personal Trainer
- Fitness Centre Manager
- Outdoor Activities Manager
- Gym Trainer
- Yoga Trainer
- Professional Sports Teacher

**Why choose us?**

- Highly Qualified and Experienced Teaching Staff
- Financial assistance up to 2.5 lakhs to elite athletes.
- High Quality Sports Infrastructure
- Scholarships up to Rs 50,000/- to every National Medal winner.
- Cash rewards to every current National Medal winners
- Free Hostel facilities to elite athletes.

**100% Tuition fees waveir for International and National medalists.**

ADMISSION ENQUIRY
7972114883
9503745405

**Subject Offered**

1) Physical Education
2) Sports Education
3) Sports Training
4) Sports Kinesiology
5) Fitness Management
6) Sports Psychology
7) Adventure Sports
8) Sports Specialization
9) Sports Journalism

**Contact**

Phone : 0231-2609266/67
Web. : http://apps.unishivajii.ac.in
DEPARTMENT OF SPORTS & PHYSICAL EDUACATION